सौ. धनश्री विक्रांत जैन व इतर १ **...अर्जदार...**

... <u>**विरूध्द**</u> ...

श्री. विक्रांत नेनमल जैन **...सामनेवाले...**

**<u>निशाणी क्रमांक ११ वरील आदेश</u>**

(पारीत दिनांक ०९/१०/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १४४ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सदरचा अर्ज अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे—

२. अर्जदार क्र. १ हिने सदरच्या अर्जात सविस्तर हकिकत लिहिली आहे, सध्या अर्जदार क्र. १ व तिचा अज्ञान मुलगा तिच्या माहेरी वास्तव्यास आहे, अर्जदार क्र.१ व २ यांचा वास्तव्याचा पत्ता मुख्य अर्जात नमूद केला आहे.

३. अर्जदार क्र.१ व सामनेवाला यांचा विवाह हिंदुधर्माशास्त्र पध्दतीने व रूढी परंपरेनुसार दिनांक १३/०७/२०२१ रोजी ऋषीवन रिसॉर्ट, खोपोली फाटा, ता. खालापूर, जि. रायगड येथे संपन्न झाला. सामनेवाला व अर्जदार क्र. १ यांचे पती पत्नी म्हणून नाते आजही अस्तित्वात आहे. अर्जदार क्र. १ हिच्या आईवडीलांनी सदर लग्नास सुमारे १०,००,०००/— (रूपये दहा लाख मात्र) इतका खर्च केला.

४. अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांचे लग्न लागुन झाले त्या दिवशी सामनेवाला हा अर्जदार क्र. १ हिस सासरी घेवून गेला नाही. सामनेवाला व त्याचे नातलग लग्नाचे ठिकाणीच मुक्कामास थांबले परंतु दुसऱ्या दिवशी दिनांक १४/०७/२०२१ रोजी अर्जदार क्र.१ हिस सामनेवाला आपल्या सोबत घेवून गेला नाही. सामनेवाला यास दूसरे लग्न करण्यासाठी अर्जदार क्र.१ हिच्याकडून फारकत (घटस्फोट) हवा आहे. सामनेवाला याचे म्हणणे आहे की, अर्जदार क्र. १ हिने सामनेवाला यांच्याकडून रू. १०,००,०००/— (रूपये दहा लाख मात्र) स्विकारून कोर्टात न जाता घटस्फोट द्यावा या त्यांच्या मागणीस अर्जदार क्र.१ हिने नकार दिलेला

आहे.

५. दिनांक ०७/०४/२०२४ रोजी अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ला सोबत घेवून सामनेवाला यांच्या घरी बोर्ली पंचतन येथे रहावयास गेली असता, सामनेवाला व त्याच्या आईने अर्जदार क्र.१ हिला अपमानीत करून बाळासहीत हाकलून दिले. एक महिण्यानंतर संपर्क साधला असता, सामनेवाला याने सांगितले की, अर्जदार क्र.१ तिथे गेली तर तिला व बाळाला घरात घेणार नाही व पोलीसांच्या ताब्यात देईल अगर तिला व मुलाला जिवे मारून टाकेन.

६. सामनेवाला यांचे होलसेल व रिटेल भुसार मालाचे दुकान असून त्यास मासिक उत्पन्न/नफा सुमारे रू.२,५०,०००/—(रूपये अडिच लाख मात्र) ते ३,००,०००/— (रूपये तीन लाख मात्र) इतके मिळते असे सामनेवाला याने लग्न होण्यापूर्वी सांगितलेले आहे.

७. अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रू. ३०,०००/— (रूपये तीस हजार मात्र) देण्यास सामनेवाला समर्थ आहे. मुबलक उत्पन्न असूनही सामनेवाला याने अर्जदार क्र.१ व २ यांचे उदरभरणाची तसेच बाळाचे औषधपाण्याची तजविल केलेली नाही.

८. सामनेवाला यांना वेळोवेळी संधी देवून देखील त्यांनी म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे त्यांच्या विरुध्द म्हणणे नाही असा आदेश करण्यात आला.

९. अर्जदार यांच्यातर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरून व अर्जातील कथनांवरून खालील मुद्दे उपस्थित होतात त्यावर मी कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदवले आहेत ते पुढीलप्रमाणे —

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१** | समनेवाला याने उत्पनाचे साधन असून देखील अर्जदारचा सांभाळ करण्यास असमर्थता दर्शवली आहे का ? | **होकारार्थी** |
| **२** | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता —**

१०. अर्जदारनी त्यांचे मालमत्ता व दायीत्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी १४ वर दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्यांचे शिक्षण बी.ए.एल.एल.बी. नमूद आहे. दि. ११/०२/२०२३ पासून त्या विभक्त राहत आहेत. त्यांच्यावर त्यांचा मुलगा यश हा अवलंबून आहे. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. रक्कम रुपये ३०,०००/— एवढा खर्च दरमहा होतो व मुलाचा खर्च दरमहा रु. ६०,०००/— होतो असे नमूद केलेले आहे. सामनेवालाचे शिक्षण १० वी असून त्यांचे होलसेल व रिटेल भुसार मालाचे दुकान असून त्यामधुन दरमहा अडीच ते तीन लाख एवढे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला याचे स्वतःचे मालकीचे तीन मजली घर असून तो आई सोबत तेथे राहतो असा मजकूर नमूद केलेला आहे.

११. सामनेवाला याने म्हणणे दाखल केलेले नाही तसेच मालमत्ता व दायीत्वाचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले नाही. सामनेवाला याला मिळणारे उत्पन्न ती त्याच्या वैयक्तिक ज्ञानातील बाब असुन त्याने त्याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. त्यामुळे तो स्वतःचा व कुटूंबाचा सांभाळ करण्यास सक्षम नाही असा देखील कोणताही पुरावा प्रथमदर्शनी अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार व मुलगा यश याचा सांभाळ करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी सामनेवाला याची आहे. सामनेवाला याने अर्जदार व मुलासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केल्याचे कागदपत्र देखील अभिलेखावर नाहीत. त्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम १४४ प्रमाणे उत्पन्नाचे साधन असून देखील सामनेवाला याने त्याबाबत कोणतीही तरतूद केलेली नसल्याने तो त्याची जबाबदारी टाळत असल्याचे निष्पन्न होते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे.

१२. अर्जदारच्या कथनांप्रमाणे सामनेवाला यास किरकोळ व भुसार मालाच्या दुकानातून दरमहा अडीच ते तीन लाख उत्पन्न मिळते असे गृहीत धरल्यास त्या अनुषंगाने अंतरीम पोटगीचा आदेश करणे आवश्यक आहे. सद्य परिस्थितीत असणारी महागाई व अर्जदार तसेच मुलगा यश यांना एकत्रित अंतरीम पोटगी म्हणून रक्कम रुपये ५,०००/— देणे योग्य होईल. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा निशाणी क्र. ११ चा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाले याने अर्जदार क्र. १ व २ यांना एकत्रित दरमहा रुपये ५,०००/— (रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २९/११/२०२४ रोजी पासून द्यावेत.

३. सदर अंतरिम पोटगीची रक्कम सामनेवालेने दर महिन्याच्या १० तारखेच्या आत अर्जदारास अदा करावी.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.10.10 17:32:00 +0530

( एस. एस. देशमुख )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
खालापुर.

ठिकाण:— खालापुर.
दिनांक:— ०९/१०/२०२५.

## Certificate

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 09/10/2025 |
| Order signed by P. O. On | : | 10/10/2025 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 10/10/2025 |